# सुरेश गुळमे यांना डाळींबाचे २५ टन विक्रमी उत्पन्न

**सोलापूर (प्रतिनिधी) :** राज्यातील शेतकरी विविध प्रकारच्या जमिनीत फलोत्पादन घेत असतात. प्रामुख्याने सोलापूर,नाशिक,अहमदनगर,पुणे,सांगली, सातारा,जालना,उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यांमध्ये व्यापारी तत्त्वावर डाळिंबाची लागवड केली जाते.महाराष्ट्रामध्ये डाळिंबाचे जवळपास १.२० लाख हेक्टर क्षेत्र आहे.पण बदलत्या हवामानामुळे डाळींबावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत आहे.त्यामुळे डाळींब उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. राष्ट्रिय डाळिंब संशोधन केंद्र,सोलापुर व रिलायन्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डाळिंब उत्पादकांसाठी किड व रोग व्यवस्थापन यावरती कार्यक्रम घेण्यात आला. या शिबीरामुळे करकंब ता.पंढरपुर,जिल्हा सोलापुर, येथील डाळींब उत्पादक शेतकरी सुरेश गुळमे, यांना १२०० झाडांमधुन २५ टन उत्पन्न मिळाले आहे.राष्ट्रिय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापुर व रिलायन्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डाळिंब उत्पादकांसाठी करकंब येथे किड व रोग व्यवस्थापन यावरती कार्यक्रम घेण्यात आला.



यावेळी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या संचालिका डॉ ज्योत्सना शर्मा तसेच डॉ.मल्लिकार्जुन,डॉ.निलेश गायकवाड यांनी प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले होते. सुत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होता.१२०० डाळींबाच्या झाडांपासून सुरेश गुळमे २५ टन उत्पन्न मिळाले. प्रती टन ३०००० दर मिळाल्यामुळे ७.५ लाख रुपयाचे उत्पन्न मिळाले. पुर्वी १० ते १२ टन उत्पन्न मिळत होते. आर्थिक उत्पन्न १० लाखांच्या पुढे गेले असते.कमी दर मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.रिलायन्स फाउंडेशनच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्यक्रमामुळे तसेच राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या मार्गदर्शनामुळे फायदा झाल्याचे गुळमे यांनी सांगितले.